**आदर्श विद्या प्रसारक संस्थेचे,**

# आदर्श कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
# कुळगांव बदलापूर

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव याचे औचित्य साधून आ. वि. प्रसारक संस्थेचे आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय कुळगांव-बदलापूर व विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखा, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण स्वामी गोशाळा लव्हाली येथे रविवार दिनांक १४/०८/ २०२२ रोजी ठिक सकाळी ९:00 वाजता वृक्षरोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला कल्याण स्वामी गोशाळेचे प्रमुख श्री.पराग स्वामी यांनी उपस्थित सर्वाना गोशाळे बाबत माहिती दिली व गाई पासून कोणत्या वस्तु बनतात याची माहिती दिली. व पर्यावरण संवर्धना करीता गाय किती उपयुक्त आहे,याची माहिती सर्वांना दिली व नंतर माननीय प्र. प्राचार्या डॉ. संगीता पांडे यांच्या उपस्थितीत वृक्षोरोपण कार्यक्रमाला सुरुवात झाली. ऱाष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या वतीने पेरू, चिकू, सिताफळ, आंबा, या १२० फळ झाडांची लागवड करण्यात आली.

या वृक्षरोपण कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे ६० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याच बरोबर महाविद्यालयाचे प्र-प्राचार्या संगीता पांडे, स्वामी विवेकानंद केंद्राचे कार्यकर्ते माननीय मीनाताई देशपांडे, श्री. राजेश कुलकर्णी आणि कल्याण स्वामी गोशाळेचे प्रमुख श्री. पराग स्वामी व रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडिस्ट्री एरियाचे श्री विनोद जडे व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. वृक्षरोपणा करिता जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री पराग स्वामी यांचे महाविद्यालयाच्या वतीने आभार मानण्यात आले.